| MHKO160007992022 | दाखल तारीख | १०/११/२०२२ | | |
|---|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | १०/११/२०२२ | | |
| | निकाल तारीख | ०५/०१/२०२३ | | |
| | कालावधी | वर्ष | महिने | दिवस |
| | | ० | ०१ | २६ |

**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,मलकापूर–शाहुवाडी यांचे न्यायालयात**

**(पिठासन अधिकारीः अमोल श्रीराम शिंदे)**

**नियमित सदिवाणी दावा क्र.१५६/२०२२**

**निशाणी क्र.**

**१. श्री. ओंकार नथुराम भाकरे**
व.व. २२, धंदा – नोकरी,
रा. हणमंतवाडी, पो. सुपात्रे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर
**२. गौतमी नथुराम भाकरे,**
व.व. १९, धंदा – शिक्षण, रा. सदर,
सध्या रा. सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर

**वादी**

**विरुध्द**

**१. श्री. नथुराम शंकर भाकरे,**
व.व.५१, धंदा – शेती,
रा. हणमंतवाडी, पो. सुपात्रे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर
**२. इंदूबाई दादु बोरगे,**
व.व. सज्ञान, धंदा – शेती,
रा. वरेवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर
**३. सुनंदा कृष्णा हांडे,**
व.व. सज्ञान, धंदा – शेती,
रा. सुपात्रे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर,

**प्रतिवादी**

**४. संगीता पांडूरंग जाधव,**
व.व. सज्ञान, धंदा – घरकाम,
रा. धबधबेवाडी (पाटेकरवाडी) ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर } **प्रतिवादी**

**दावा – दावा मिळकतीचे सरस निरस मानाने स्वतंत्र वाटणी होवुन कब्जात मिळणे बाबत.**

---

वादीतर्फे विधीज्ञ : एस. एस. यादव
प्रतिवादी नं.१ तर्फे : एकतर्फा
प्रतिवादी नं.२ ते ४तर्फे : यु. एल. जाधव – खोत

---

**नि का ल प त्र**
**(घोषित केल्याचा दि. ०५/०१/२०२३)**

प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादीं विरुध्द सरस निरस मानाने स्वतंत्र वाटणी होवुन कब्जात मिळणे करिता व कायम मनाई मिळणे करीता दाखल केला आहे.

२. **वादींचे थोडक्यात कथन असे की** –

प्रस्तुत दावा वादींनी या कोर्टाचे स्थळ सिमेतील तुकडी व जिल्हा कोल्हापूर, मौजे सुपात्रे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील शेतजमिनी पुढीलप्रमाणे –

| अ. नं. | गट नं. | एकूण क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे | पैकी वाद हे. आर. | आकार रु. पैसे | पैकी प्रतिवादी नं. १ च्या १/४ हिस्सेपैकी वादींचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ३७५ | ७.४७.००<br>पो. ख. ०.४५ | ३.७५ | ०.४४.५० | ०.२२ | १/३ |
| २. | ३७७ | २.५४.००<br>पो.ख. ०.१० | १.८७ | ०.४२.३३ | ०.३१ | १/३ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. | ३७९ | ९.२४.३०<br>पो.ख. २.२५ | २५.३१ | ०.७१.९३ | १.९७ | १/३ |
| ४. | ३८० | २.२२.००<br>पो.ख. ०.४३ | ८.४४ | ०.११.० | ०.४२ | १/३ |
| ५. | ३८१ | ४.३५.००<br>पो.ख. ०.१७ | १०.३१ | ०.१५.८६ | ०.३७ | १/३ |
| ६. | ४१२ | ०.१४.१० | १.७३ | ०.१४.१० | १.७३ | १/३ |
| ७. | ४७१ | ०.४०.००<br>पो.ख. ०.०५ | ०.४४ | ०.४०.०० | ०.४४ | १/३ |
| ८. | ४८९ | १.००.०० | १.७९ | ०.१२.५० | ०.२२ | १/३ |
| ९. | ४९० | ०.११.०० | ०.१२ | ०.११.०० | ०.१२ | १/३ |
| १०. | ५०७ | ०.०९.१० | १.१५ | ०.०९.१० | १.१५ | १/३ |
| ११. | ५१८ | १.५४.००<br>पो.ख. ०.०३ | ०.८२ | ०.२५.७७ | ०.१४ | १/३ |
| १२. | ५३० | ०.६४.०० | २.४३ | ०.६४.०० | २.४३ | १/३ |
| १३. | ५५७ | ०.१९.००<br>पो. ख. ०.०१ | ०.१३ | ०.१९.०० | ०.१३ | १/३ |
| १४. | ५०२ | ०.१४.१० | १.६९ | ०.१४.१० | १.६९ | १/३ |
| | | | | | **११.३४** | |

येणे प्रमाणे वर्णनाच्या मिळकतीं हि या दाव्याचा विषय असुन येथुन पुढे तिला 'दावा मिळकतीं' असे संबोधले जाईल.

**३.** वादींने पुढे असे कथन केले आहे कि, वादी क्रं. १ व २ हे प्रतिवादी क्रं. १ यांची अपत्ये असून, प्रतिवादीं क्रं. २ ते ४ या प्रतिवादी क्रं. १ च्या सख्या बहिणी असून, वादींच्या आत्या

आहेत. दावा मिळकतीं वादीं व प्रतिवादीं यांची वाडवडिलार्जित मिळकतीं असून त्यामध्ये दोन्ही पक्षकार हे सामाईकात सोईप्रमाणे वहिवाट करतात. दावा मिळकतीं या मूळच्या शंकर भाकरे यांच्या वडिलार्जित मिळकतीं असून त्यांच्यापश्चात दावा मिळकतीं प्रतिवादींच्या नांवे नोंद झालेल्या आहेत. वादीं यांची आई ते लहान असतानाच मयत झालेली आहे. वादी क्रं. २ यांचा सांभाळ त्यांचे मामांनी केला. प्रतिवादी क्रं. १ यांनी वादी यांना १० वी होईपर्यत सांभाळले. त्यानंतर प्रतिवादी क्रं. १ यांनी त्यांची कोणतीही व्यवस्था केली नाही. तसेच दावा मिळकतींमध्ये आजपर्यत कोणताही हिस्सा दिलेला नाही. दावा मिळकतींचे आजपर्यत वाटप झालेले नाही. प्रतिवादी क्रं. १ हे दावा मिळकतीं विक्री करणेच्या तयारीत आहेत. त्यामूळे दि. २९/१०/२०२२ रोजी वादीं यांनी प्रतिवादी क्रं. १ कडे त्यांचा हिस्सा मागितला असता, प्रतिवादीं यांनी वादींना त्यांचा हिस्सा दिला नाही म्हणून वादींनी सदरचा दावा, दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी व तुटक कब्जा होवून मिळणेसाठी सदरचा दावा दाखल केलेला असून तो मंजूर होणे विषयी विनंती केली.

४. प्रतिवादी नं.१ यांना नि. ६ वर दाव्याची समन्स लागू होवून देखील ते हजर न झालेने त्यांचे विरुध्द एकतर्फा आदेश पारीत करणेत आला. प्रतिवादी क्रं. २ ते ४ यांनी नि. १६ वर त्यांची कबूली कैफियत देवून वादींचा दावा मान्य व कबूल केलेला आहे. तसेच त्यांनी दावा मिळकतींचे वर्णन व वंशावळ खरी व बरोबर असलेचे मान्य केले आहे. तसेच प्रतिवादी क्रं. १ यांच्या १/४ हिस्सेपैकी प्रत्येकी १/३ हिस्सा वादीं यांचा असल्याचा त्यांनी मान्य व कबूल केले. याबाबत त्यांनी कैफियत देवून दावा मंजूर करणे विषयी विनंती केली.

५. वादीं व प्रतिवादी क्रं. २ ते ४ यांचे तर्फे त्यांचे विधीज्ञांचा विस्तृत युक्तीवाद ऐकण्यात आला.

६. प्रतिवादीं क्रं. २ ते ४ यांनी वादींचा दावा मान्य व कबूल केल्यामूळे न्यायालय प्रकरण आदेश १२ नियम ६ अन्वये निकाली काढत आहे. वादीं यांनी नि. १७ ते ३० वर दावा मिळकतींचे ७/१२ उतारे दाखल केले आहेत. तसेच प्रतिवादीं यांनी वादींना त्यांचा हिस्सा दिला नाही म्हणून वादींनी सदरचा दावा, दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी व तुटक कब्जा होवून मिळणेसाठी सदरचा दावा दाखल केलेला आहे. तो दावा प्रतिवादी क्रं. २ ते ४ यांनी मान्य व कबूल केला आहे. त्यामूळे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. दावा खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. वाद मिळकतीं मध्ये प्रतिवादीं यांचा प्रत्येकी १/४ हिस्सा आहे असे जाहिर करणेत येते.

३. प्रतिवादी क्रं. १ यांच्या १/४ हिस्सेमध्ये वादीं व प्रतिवादी क्रं. १ यांचा प्रत्येकी १/३ हिस्सा आहे असे जाहीर करणेत येते.

४. दावा मिळकतीं जोपर्यत वादीं यांच्या कब्जे वहिवाटीत सरस निरस मानाने तुटक होवून कब्जा मिळत नाही तोपर्यत प्रतिवादीं यांनी दावा मिळकतीवरती कर्जबोजे निर्माण करु नयेत अगर दावा मिळकतीं तबदिल, विक्री अगर हस्तांतरीत करु नये असा कायम मनाई आदेश प्रतिवादीं विरुध्द पारीत करणेत येत आहे.

५. सदरचा हुकूमनामा हा मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम ५४ अन्वये वाटपासाठी पाठवणेत यावा.

६. येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

*(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)*

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Amol Shriram Shinde
Date: 2023.01.10 11:51:10 +0530

दि. ०५/०१/२०२३

**( अमोल श्रीराम शिंदे )**

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर शाहुवाडी-मलकापूर**

**जि. कोल्हापूर**

**-: प्रमाणपत्र :-**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र आदेश यामधील सर्व मजकूर मूळ निकालपत्र आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | श्री.एस.एम.गुरव |
| न्यायालयाचे नांव | अमोल श्रीराम शिंदे, ६ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कोल्हापूर |
| श्रुतलेखन/टाईप केल्याचा दिनांक | ३०/१०/२०२१ |
| न्यायिक अधिका-यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | ३०/१०/२०२१ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | ३०/१०/२०२१ |